पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १९

**सभावृत्तांत**

दिनांक - ०३/०९/२०२१ वेळ - दुपारी ३.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माविधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक ०३/०९/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील तिस-या मजल्यावरील मा.सभापती, विधी समिती यांचे दालनात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/ नवि-१४ दि. ३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालीलप्रमाणे काही सन्मा.सदस्य सभागृहात तर काही सन्मा.सदस्य ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) उपस्थित होते.

१. **मा.स्वीनल कपिल म्हेत्रे - सभापती**
२. मा.वसंत प्रभाकर बोराटे
३. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
४. सुजाता सुनिल पालांडे
५. मा.चौगुले सीमा दत्तात्रय
६. मा.गोफणे अनुराधा देविदास
७. मा.सुलक्षणा राजू धर
८. मा.अमित राजेंद्र गावडे

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.सुभाष इंगळे - उप आयुक्त, मा.राजेश आगळे - सहाय्यक आयुक्त हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.२) 'माहिती व तंत्रज्ञान अधिकारी' पदावरील पदोन्नतीस मान्यता घेणेबाबत.

विषय क्र.३) 'वैद्यकिय अधिक्षक' पदावरील पदोन्नतीस मान्यता घेणेबाबत.

विषय क्र.४) मौजे भोसरी कासारवाडी येथील आरक्षण क्र.१३ विकसित करणे या कामाचा जागेत बदल करणेबाबत. मा.सुजाता पालांडे व मा.स्वीनल म्हेत्रे यांचा प्रस्ताव.

----------

मा.विधी समिती सभा (कार्यपत्रिका क्र.१८) दिनांक २०/०८/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - ५१ विषय क्रमांक -०१

दिनांक - ०३/०९/२०२१

सुचक : मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा.अनुराधा गोफणे

संदर्भ - मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/२/कावि/८६४/२०२१, दि.२२/०७/२०२१

विषय - कार्यकारी अभियंता (स्थापत्य) पदावरिल पदोन्नती बाबत.

विषय क्र.१ चा विचार दि.१८/१०/२०२१ च्या सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ५२ विषय क्रमांक -०२

दिनांक - ०३/०९/२०२१ विभाग - प्रशासन विभाग

सुचक : मा.वसंत बोराटे अनुमोदक : मा.सुजाता पालांडे

संदर्भ : मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/२/कावि/१०८५/२०२१, दि.२८/०८/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर '**माहिती व तंत्रज्ञान अधिकारी**' अभिनामाची पदे **S-२३ वेतनश्रेणी र.रु ६७७००-२०८७००** मध्ये शासन मंजूर असून पदोन्नती करीता १ पद रिक्त आहे. '**माहिती व तंत्रज्ञान अधिकारी**' अभिनामाची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याकामी मा.आयुक्त सो यांच्या अध्यक्षते खाली पदोन्नती समिती सभा दिनांक २१/०८/२०२१ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व **'कॉम्प्युटर प्रोग्रॅमर'** पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, मत्ता व दायित्व, संगणक अर्हता आणि शिस्तभंग विषयक कारवाई इत्यादि सेवाविषयक तपशिल पडताळून, खालील **'कॉम्प्युटर प्रोग्रॅमर'** यांना पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधिन व शासन निर्णय दि.७/०५/२०२१ चे अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार '**माहिती व तंत्रज्ञान अधिकारी**' पदावर **एस-२३ वेतनश्रेणी र.रु ६७७००-२०८७००** या वेतनश्रेणीत पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार तसेच मा.विधी/मा.महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देण्याबाबत पदोन्नती समितीने सर्वानुमते शिफारस केली आहे.

| अ.क्र | कॉम्प्युटर प्रोग्रॅमरकर्मचा-यांचेनावं | पदोन्नतीचा प्रवर्ग |
|---|---|---|
| १ | श्रीम.गोडसे उज्वला दत्तात्रय | ज्येष्ठतेनुसार |

सबब,उपरोक्त **‘कॉम्प्युटर प्रोग्रॅमर’** यांना **एस-२३ वेतनश्रेणी र.रु ६७७००-२०८७००** मध्ये **'माहिती व तंत्रज्ञान अधिकारी'** पदावर, पदोन्नतीमधील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीन व शासन निर्णय दिनांक ०७/०५/२०२१ चे अधिन राहून सेवाज्येष्ठतेनुसार रिक्त जागेवर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ५३ विषय क्रमांक : ०३

दिनांक - ०३/०९/२०२१ विभाग : प्रशासन विभाग

सुचक : मा.वसंत बोराटे अनुमोदक : मा.सुजाता पालांडे

संदर्भ : मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/२/कावि/१०८६/२०२१, दि.२८/०८/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर **‘वैद्यकीय अधिक्षक’** अभिनामाचे १ पद **पे.लेवल S-२५ वेतनश्रेणी ७८८००-२०९२००** मध्ये शासन मंजूर असून पदोन्नती करीता रिक्त आहे. **‘वैद्यकीय अधिक्षक’** अभिनामाची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याकामी मा.आयुक्त सो यांच्या अध्यक्षते खाली पदोन्नती समिती सभा दिनांक २१/०८/२०२१ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व **‘वैद्यकीय उपअधिक्षक’** पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, मत्ता व दायित्व, संगणक अर्हता आणि शिस्तभंग विषयक कारवाई इत्यादि सेवाविषयक तपशिल पडताळून, खालील **‘वैद्यकीय उपअधिक्षक’** यांना पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधिन व शासन निर्णय दि.०७/०५/२०२१ चे अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात सेवाज्येष्ठतेनुसार **‘वैद्यकीय अधिक्षक’** पदावर **पे.लेवल S-२५ वेतनश्रेणी ७८८००-२०९२००** या वेतनश्रेणीत पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार तसेच मा.विधी/मा.महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देण्याबाबत पदोन्नती समितीने सर्वानुमते शिफारस केली आहे.

| अ.क्र | वैद्यकीय उपअधिक्षक नाव | पदोन्नतीचा प्रवर्ग |
|---|---|---|
| १ | डॉ.जाधव शंकर बळवंत | ज्येष्ठतेनुसार |

सबब, उपरोक्त **'वैद्यकीय उपअधिक्षक'** यांना **पे.लेवल S-२५ वेतनश्रेणी ७८८००-२०९२००** मध्ये **'वैद्यकीय अधिक्षक'** पदावर, पदोन्नतीमधील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीन व शासन निर्णय दिनांक ०७/०५/२०२१ चे अधिन राहून सेवाज्येष्ठतेनुसार रिक्त जागेवर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५४ विषय क्रमांक - ०४

दिनांक - ०३/०९/२०२१

सुचक : मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा.स्वीनल म्हेत्रे

संदर्भ : मा.सुजाता पालांडे व मा.स्वीनल म्हेत्रे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.२० कासारवाडी येथील आरक्षण क्र.१३ विकसित करणे निवदा क्र.५/१/२०१८-१९ हे निविदेचे काम करणेत येत आहे. त्यानुसार प्रत्यक्ष जागेवर काम सुरु करणेत आले आहे. सद्यस्थितीत काम ९५% पुर्ण झालेले आहे. सदरच्या कामातून आरक्षणाला जोडणारे रस्ते विकसित करणेत येणार होते. त्यातून उर्वरित रस्ते व आरक्षण विकसित करणेत आले आहे. परंतु पूर्वेकडील रस्ता ताब्यात न आल्यामुळे सदरच्या रस्त्याचे काम करणे शक्य नाही. त्यामुळे आरक्षण विकसित करणेच्या कामातून अंदाजे ५०.०० लक्ष रुपये शिल्लक राहत आहे. याबाबत प्रभाग क्र.२० येथील नगरसदस्य. नगरसदस्या यांनी सदर कामातून प्रभाग क्र.२० येथील विविध भागात स्थापत्य विषयक कामे करणेची मागणी केली आहे. तरी सदर निविदेच्या कामातून प्रभाग क्र.२० येथील विविध भागात स्थापत्य विषयक कामे करणे व सदर कामाच्या स्थळ बदलास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाची अंमलबजावणी करावी.


सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( स्वीनल कपिल म्हेत्रे )**
**सभापती-**विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/४१७/२०२१
दिनांक : ०३/०९/२०२१



**(उल्हास बबनराव जगताप)**
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.